दैनिक आरंभ मराठी
18 Sep 2024 - Page 2
epaper.arambhmarathi.com

# मोबाईलच्या अतिवापरामुळे युवा पुढीच्या जगण्यावर विपरीत परिणाम

## उमरगा येथे सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा कार्यक्रमात प्रतिक्षा पांगे यांचे प्रतिपादन

**आरंभ मराठी । उमरगा**

शालेय व महाविद्यालयीन मुलां-मुलीं मध्ये मोबाईल वापरण्याच्या प्रमाणात कमालीची वाढ झाली आहे. आपल्या शैक्षणिक विकासापेक्षा मोबाईल वापराकडे विद्यार्थ्यांचा कल मोठ्या प्रमाणात वाढला आहे. मोबाईलच्या अति वापरामुळे आपल्या जगण्यावर विपरीत परिणाम होवू लागला आहे. आजची तरुण पिढी मोबाईल प्रेमी होऊ लागली आहे.महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी मोबाईलच्या अति वापरापासून स्वतःला दूर ठेवावे. असे अवाहन लातूर येथील व्याख्याती प्रतिक्षा पांगे यांनी केले. आदर्श महाविद्यालय उमरगा, क्रीक हिल फाऊंडेशन व राजर्षी शाहू महाविद्यालय



लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने आदर्श महाविद्यालयात हिंदी दिना निमित्त सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या विषयावर प्रतिक्षा पांगे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले या वेळी त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. दिलीप गरुड होते. उपप्राचार्य डॉ. सुरेश कुलकर्णी, प्रा. डॉ. राम सोलंकर,प्रा. डॉ. अनुराधा मिरगणे यांची प्रमुख उपस्थिती होती. आजची तरुणाई मोबाईलच्या अति वापरा मुळे स्वतःचे अस्तित्व विसरत चालली आहे. मोबाईल मध्ये फसवणुकीच्या प्रमाणात दिवसेंदिवस मोठी वाढ होत आहे. फोटो मॉर्फिंग, पासवर्ड सुरक्षा, बँकिंग, फेककॉल, ऑनलाईन गेमिंग, फेक मेसेज, हॅकिंग , पॉर्न व्हीडीओ, पॉर्नग्राफी, थर्ड पार्टी प्लीकेशन, ओटीपी या विविध मोबाईल वापराच्या प्रकारामुळे व्यापारी, शेतकरी, महिला तरुण मुले मुली यांची मोठया प्रमाणात आर्थिक मानसिक फसवणूक केली जात आहे. आपला ओटीपी कधी अनोळखी व्यक्तींना सांगू नका. फेक लिंक ला कधीही क्लीक करू नका. फेसबुक, वॉटसप, ईन्स्ट्राग्राम, स्नॅपचॅट या सोशल मेडियाच्या वापरा पासून अठरा वर्षाच्या आतील मुलांमुलीना दूर ठेवा. ऑनलाईन गेमच्या व्यसनामुळे अनेक मुलांना आपले नाहक प्राण गमवावे लागले आहेत. अनाधिकृत वेबसाईटच्या फसवणुकी पासून दूर रहा. मोबाईलच्या अतिवापरामुळे आरोग्य धोक्यात येण्याच्या प्रमाणात कमालीची वाढ झाली. मोबाईल वापरा वेळी आपली फसवणूक झाल्याचे समजताच

१९३० या हेल्पलाईनला संपर्क करा. आपल्या जीवाभावाच्या नातेवाईकांशी प्रत्यक्ष संवाद साधून नात्यातील जवळीकता अधिक सक्षम करा. असा सल्ला पांगे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना दिला. प्रास्ताविक प्रा.डॉ. अनुराधा मिरगणे यांनी केले. सुत्रसंचलन प्रा. तात्याराव चव्हाण यांनी केले. आभार प्रा. डॉ. युवराज जाधव यांनी मानले.